महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०२ वे | दिनांक : ३०/१०/२०२६ | वार : शुक्रवार

नागपूरच्या विजयानंतर काँग्रेसचा पलटवार; फडणवीसांनी ट्वीट डिलीट केल्याचा दावा

नागपूर : नागपूर MLC निवडणुकीत काँग्रेसने सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला आहे. या विजयानंतर काँग्रेसने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टोला लगावला. पक्षाने दावा केला की, फडणवीस यांनी निवडणुकीचे संपूर्ण निकाल जाहीर होण्यापूर्वी सोशल मीडियावर पोस्ट केली होती; मात्र नंतर ती डिलीट केली. काँग्रेसने म्हटले- फडणवीस यांनी निवडणुकीचे संपूर्ण निकाल जाहीर होण्यापूर्वीच मोठा तीर सोडल्याच्या ट्विट केले. मात्र त्यांचा तीर त्यांच्याच छातीत जाऊन लागला. दाव्यानुसार, फडणवीस यांनी पंतप्रधानांची पोस्ट शेअर करत लिहिले होते- अगदी शून्य! किमान काँग्रेस एका गोष्टीत तरी सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी पोस्ट केले होते- ४ राज्यांतील २८ MLC जागांसाठी मतपत्रिकेद्वारे निवडणूक झाली. अंदाज लावा, काँग्रेसने किती जागा जिंकल्या? पंतप्रधानांच्या पोस्टपूर्वी काँग्रेसने ४ राज्यांमध्ये एकही जागा जिंकली नव्हती. मात्र त्यानंतर काँग्रेसने नागपूरची जागा जिंकली. नागपूर हे मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे गृहक्षेत्र असून भाजपचा बालेकिल्ला मानले जाते. येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालयही आहे. अशा क्षेत्रात काँग्रेसच्या विजयाकडे भाजपसाठी राजकीय धक्का म्हणून पाहिले जात आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी 23 ऑक्टोबर रोजी मतदान झाले होते. मतमोजणी 27 ऑक्टोबर रोजी सुरू झाली आणि 29 ऑक्टोबरच्या सकाळी पूर्ण झाली. मतमोजणी 40 तासांहून अधिक काळ चालली. सुरुवातीच्या टप्प्यात भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे आघाडीवर होते. पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी झाल्यानंतर कोहळे यांना ६०,९२४ मते मिळाली होती, तर अभिजीत वंजारी यांना ५६,६३० मते मिळाली. अपक्ष उमेदवार नितेश कराळे यांना २४,२४९ मते मिळाली होती. कोणत्याही उमेदवाराला विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा मिळाला नसल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करण्यात आली. त्यानंतर वंजारी यांनी आघाडी घेत विजय मिळवला.

२०२० मध्येही वंजारी विजयी झाले होते

अभिजीत वंजारी हे पेशाने वकील आणि शिक्षणतज्ज्ञ आहेत. त्यांनी २०२० मध्ये पहिल्यांदा नागपूर पदवीधर मतदारसंघातून विजय मिळवला होता. त्यावेळी त्यांनी भाजपचे उमेदवार संदीप जोशी यांचा पराभव केला होता. यावेळच्या विजयासह त्यांनी विधान परिषदेत सलग दुसरा कार्यकाळ मिळवला.वंजारी विद्यार्थी राजकारणाशी संबंधित राहिले आहेत. त्यांनी 1998 ते 2002 दरम्यान महाराष्ट्र प्रदेशात नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (NSUI) चे महासचिव म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस आणि नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटीमध्येही संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

विधानपरिषद विजय हा परिवर्तनाचा नवा ट्रेंड : सुप्रिया सुळेंचा भाजपला टोला

पुणे : "निवडणुकीत विजय झाला म्हणून फार हुरळून जायचे नसते आणि पराभवाने निराश व्हायचे नसते. मतमोजणीचे अधिकृत प्रमाणपत्र हातात येईपर्यंत अंतिम निकाल गृहीत धरू नये, एवढी परिपक्वता आणि खबरदारी जबाबदार पदावर बसलेल्या सर्वांनीच घेतली पाहिजे. मात्र, अतिउत्साहात केलेले ट्विट अखेर डिलीट करण्याची नामुष्की सत्ताधाऱ्यांवर ओढवली. विधानपरिषदेच्या ५ पैकी ३ जागांवर महाविकास आघाडीने मिळवलेला विजय हा महाराष्ट्रात सुरू झालेल्या एका नवीन बदलाचा आणि राजकीय ट्रेंडचा स्पष्ट संकेत आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुती आणि भाजपच्या केंद्रीय नेतृत्वावर थेट निशाणा साधला. पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे यांनी विधानपरिषद निकाल, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे डिलिट झालेले ट्विट, पक्षाचे मूळ संविधान आणि निवडणूक आयोगाचा अन्याय, कर्जत-भीमाशंकर येथील वृक्षतोड, पुण्यातील वाढती गुन्हेगारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सरकारचा 'सिलेक्टिव्ह' दृष्टिकोन यावर सडेतोड उत्तरे दिली. विधानपरिषद निकालांवर आणि भाजपच्या दाव्यांवर बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, "महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे 3 जागांवर जनतेने महाविकास आघाडीला कौल दिला आहे. मी अत्यंत प्रांजळपणे व विनम्रपणे महाराष्ट्रातील मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानते." खासदार सुळे म्हणाल्या, "पश्चिम महाराष्ट्रात चंद्रकांत दादा पाटील प्रचारात मोठे दावे करत होते; परंतु प्रत्येक विधानाला उत्तर देणे गरजेचे नसते आणि प्रत्येक बॉल खेळायचा नसतो. मतदारांनी मतपेटीतून स्वतःचे उत्तर देऊन टाकले आहे. उत्तर प्रदेशातही समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी विधानपरिषदेत अतिशय उत्तम यश मिळवले आहे, त्याबद्दल मी त्यांचेही मनापासून अभिनंदन करते."राष्ट्रवादी काँग्रेसच्या न्यायालयीन लढाईवर आणि पक्षाच्या मालकीहक्कावर त्यांनी वस्तुस्थिती मांडली. "राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना आदरणीय शरद पवार साहेबांनी केली. पक्षाचे संविधान स्पष्ट सांगते की, पक्ष कोणाचा हे केवळ आमदार किंवा खासदारांच्या संख्येवर ठरत नाही, तर पक्षाचे मूळ पदाधिकारी आणि संघटना ज्यांच्यासोबत असते त्यांचा पक्ष असतो."

उजनीच्या प्रकल्पांमुळे शेतकरी-मच्छीमारांचे अर्थकारण धोक्यात : रोहित पवार

पुणे : उजनी येथे प्रस्तावित एआय डेटा सेंटर आणि अणुऊर्जा प्रकल्पांसाठी नऊ टीएमसी पाणी लागणार आहे. त्यामुळे साडेपाच लाख शेतकरी आणि 30 हजार मच्छीमार कुटुंबांच्या अर्थकारणावर परिणाम होऊ शकतो, असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला. या प्रकल्पांमुळे पर्यावरणाचे नुकसान होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली. पवार यांनी, "उजनीतील एआय डेटा सेंटर हा विकास की विनाश?" असा सवाल केला. उजनी धरण दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या संकल्पनेतून उभे राहिले. धरणामुळे हजारो एकर जमीन सिंचनाखाली आली आणि शेतीला बळ मिळाले, असे ते म्हणाले. उजनीच्या पाण्यावर शेती, मासेमारी आणि अनेक कुटुंबांचे अर्थकारण अवलंबून आहे. मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणारे प्रकल्प उभारल्यास स्थानिक नागरिकांच्या गरजांसाठी पाणी कमी पडू शकते, अशी शक्यता पवार यांनी मांडली. सरकारने उजनी परिसरात दोन हजार मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प आणि 450 मेगावॅट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. या प्रकल्पांसह डेटा सेंटरमध्ये सुमारे एक लाख 65 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याचे सांगितले जात आहे. चीनमधील सॅनी कंपनीकडून तरंगता सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. फ्रान्स आणि दक्षिण कोरियातील कंपन्यांचाही यात सहभाग असल्याचा दावा पवार यांनी केला. डेटा सेंटरमधील सर्व्हर थंड ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी आणि वीज लागते. प्रस्तावित डेटा सेंटरसाठी सहा टीएमसी, तर अणुऊर्जा प्रकल्पासाठी तीन टीएमसी पाणी लागेल, असा दावा पवार यांनी केला. ठाणे शहराला वर्षभरात सुमारे 8.25 टीएमसी पाणी लागते. त्या तुलनेत या दोन प्रकल्पांसाठी नऊ टीएमसी पाणी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. उजनी धरणावर अवलंबून असलेल्या साडेपाच लाख शेतकऱ्यांची सुमारे दहा हजार कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल आहे. या प्रकल्पांमुळे त्यावर परिणाम होण्याची शक्यता पवार यांनी व्यक्त केली. राज्याच्या एकूण वीज वापरापैकी आठ टक्के वीज केवळ डेटा सेंटरसाठी लागेल, असाही त्यांचा दावा आहे. उजनी जलाशयातील मासेमारीवर सुमारे 30 हजार कुटुंबे अवलंबून आहेत. या व्यवसायातून सुमारे 200 कोटी रुपयांची उलाढाल होते. पाण्यावर सौरऊर्जा पॅनेल बसवल्याने माशांच्या अधिवासावर आणि जलचरांवर परिणाम होऊ शकतो, अशी भीती पवार यांनी व्यक्त केली.मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर येथील तरंगत्या सौरऊर्जा प्रकल्पाचा दाखला देत त्यांनी हा मुद्दा मांडला. डेटा सेंटरमधील सतत सुरू असणाऱ्या शीतकरण यंत्रणांचा आवाज, वाढती वीज मागणी आणि पाण्याचा वापर यांचाही परिसरातील पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६

कन्नड येथे "शुद्ध सेंद्रिय आहारातून आरोग्याकडे" कार्यशाळा संपन्न

कन्नड (अरुण थोरात) : कन्नड येथे आरोग्यजागृती क्षेत्रात कार्यरत ओम इंटरपाईजेस चा शुभारंभ करण्यात आला. निमित्ताने या "शुद्ध आहारातुन निरोगी जीवनाकडे" या विषयावर कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. या वेळी आरोग्य आणी स्वयंरोजगार क्षेत्रात कार्यरत मेक अँड ग्रोथ संस्थेचे सीएमडी मुकुंद वाकळे म्हणाले की, आज मार्केटमध्ये अन्नातील भेसळीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले असल्याकारणाने नागरिकांना अनेक आजारांना तोंड द्यावे लागत आहे. म्हणुन नागरिकांना शुद्ध आणि ऑरगॅनिक खाद्यपदार्थ वाजवी दरात उपलब्ध करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. यावेळी आरोग्य व आहार मार्गदर्शक डॉ. यशवंत पवार यांनी मानवाला होणारे विविध आजार , त्यांची कारण आणि त्यावर आहार, विहार आणि विचार या त्रिसूत्रेने कशी मात करता येईल यावर सविस्तर मार्गदर्शन करतांना तूप, तेल, मध, मसाला यातील भेसळ कशी केली जाते हे विषद केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यात माजी प्राचार्य अरविंद जी कांबळे , कृषिभूषण अजय जाधव, निवृत्त शंकरराव काळे, पत्रकार प्रवीण जंजाळ, मुन्नाभाई रंगरेज, अजबराव शेळके, श्री अकोलकर, शिवाजीराव बोरसे, रमेशराव नागरे, कृष्णराव काळे, अनिल शिरसाट, अर्जुन शेजवळ, प्रमोद पाटील, डॉ. दिलीप पाटील, अशोक पवार, सुनीता पवार, नलीनी पवार, सौ. अनिता पवार आदि उपस्थित होते. शेवटी भाऊसाहेबजी वाकळे यांनी आभार मानले. या वेळी असे आरोग्य जनजागृती पर कार्यक्रमाचे नियमीत आयोजन करावे अशी मागणी उपस्थितांनी केली.

जिंतूरमध्ये मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या सक्तीच्या वसुलीविरोधात आंदोलन

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि महिला बचत गटांना मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कथित सक्तीच्या वसुलीपासून दिलासा मिळावा, या मागणीसाठी आज जिंतूर येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालयात सादर करण्यात आले. नायब तहसीलदार, जिंतूर यांनी निवेदनाची प्रत स्वीकारली.तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीतील घटलेले उत्पादन आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व महिला बचत गट आर्थिक अडचणीत सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत काही मायक्रो फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी घरी जाऊन दबाव आणणे, अपमानास्पद वागणूक देणे, धमकावणे तसेच बचत गटातील इतर महिलांना वेठीस धरणे, असे प्रकार करीत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.ग्रामीण कुटा फायनान्स, भारत फायनान्स, समस्ता फायनान्स, बीएसएस, एल अँड टी, क्रेडिट अ‍ॅक्सेस, स्वतंत्र फायनान्स यांसह इतर वित्तीय संस्था, खासगी बँका आणि खासगी सावकारीच्या माध्यमातून होणाऱ्या वसुलीच्या पद्धतींची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.सक्तीची वसुली थांबविण्याची मागणीमहिला बचत गटांची सक्तीची वसुली तातडीने थांबवावी, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कर्जदारांना दिलासा देण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात आणि कर्जफेडीतील अडचणींमुळे लाभार्थ्यांच्या सीआयबीआयएल (CIBIL) गुणांकनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.तसेच, कर्जवसुलीदरम्यान धमकावणे, अपमानास्पद वागणूक देणे किंवा कायद्याच्या विरुद्ध दबाव आणणे अशा प्रकारांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. बेकायदेशीर खासगी सावकारीविरोधातही संबंधित विभागाने कार्यवाही करावी, असे निवेदनात म्हटले आहे.शेतकऱ्यांना आर्थिक मदत व पीककर्ज मिळण्याची मागणीदुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, कर्जमाफीसंदर्भातील पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध कराव्यात आणि नवीन पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.याशिवाय, शासकीय गायरान व वनीकरण जमिनींशी संबंधित नोंदींमुळे अडचणीत येणाऱ्या पात्र गरीब शेतकऱ्यांचा फार्मर आयडीचा प्रश्न मार्गी लावावा, जेणेकरून त्यांना पीककर्ज व इतर शासकीय योजनांचा लाभ मिळू शकेल. तसेच, गायरान जमिनींच्या सातबारा उताऱ्यावरील पोटखराब नोंदींची तपासणी करून नियमानुसार आवश्यक दुरुस्ती करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आवाहनया निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, परभणी, पोलीस अधीक्षक, परभणी आणि पोलीस निरीक्षक, जिंतूर पोलीस ठाणे यांना देण्यात आल्या आहेत. संबंधित वित्तीय संस्था, बँका आणि खासगी सावकारांच्या वसुली पद्धतींची चौकशी करून कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी आणि आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी व महिलांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.सामाजिक कार्यकर्ते शरद सुदामराव चव्हाण यांच्या आयोजनाखाली झालेल्या या आंदोलनातून शेतकरी आणि महिला बचत गटांच्या आर्थिक अडचणींकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास यापुढे अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.प्रविन वाकळे नामदेव तुपसुंदर,राजु गंडले,दर्शन सुरवसे, काशिनाथ भदर्गे, शंकर वाघ,सुशिला सिंनगारे,हौसाबाई चव्हाण,मिरा सुंदर वाकळे, रत्नमाला घोगरे ,सिता घोगरे, रेणुका घोगरे ,राधा घोगरे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६

महागाईला कल्पकतेचे उत्तर; बहिरगावच्या विद्यार्थ्यांनी बनविले १५० आकाशकंदील

कन्नड (प्रतिनीधी) : दिवाळीचा सण म्हटला की आकर्षक आकाशकंदील, रोषणाई आणि सजावटीची लगबग सुरू होते. मात्र, बाजारात आकाशकंदिलांचे वाढलेले भाव आणि पर्यावरणाला हानिकारक ठरणाऱ्या साहित्याचा वाढता वापर लक्षात घेऊन जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक आकाशकंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी ,आपल्या कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा वापर करून कागद ,दोरा ,व पुठ्ठ्यापासून तब्बल १५० आकर्षक आकाशकंदील तयार केले.कलाशिक्षक सलीम आत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बाजारात महागड्या किमतीत मिळणारे आकाशकंदील स्वतःच्या हातांनी अवघ्या २० रुपयांत तयार करता येतात, हे विद्यार्थ्यांनी कृतीतून दाखवून दिले. कागद आणि पुठ्ठा यांसारख्या सहज उपलब्ध साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांनी विविध आकारांचे आणि आकर्षक रचनेचे आकाशकंदील तयार केले. थर्माकोल, प्लास्टिक यांसारख्या पर्यावरणाला हानिकारक साहित्याचा वापर टाळत कमी खर्चात सुंदर सजावटीच्या वस्तू तयार करण्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी घालून दिला.सध्याच्या काळात आकाशकंदिलांच्या वाढत्या किमती आणि दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता, अनावश्यक खर्च टाळून स्वनिर्मित वस्तूंचा वापर करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपण शाळेत तयार केलेले आकाशकंदील यंदाच्या दिवाळीत आपल्या घरी लावणार असल्याचा निश्चय केला. विद्यार्थ्यांच्या या निर्णयामुळे पालकांनाही आश्चर्याचा सुखद धक्का बसला आहे.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कलाकौशल्य, कल्पकता, आर्थिक बचत, पुनर्वापराचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धन यांचे व्यावहारिक ज्ञान मिळाले. स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या वस्तूंचा आनंद घेतानाच पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळाली.या नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णा पवार सरपंच डाॅ केशव शिरसे उपसरपंच रत्नाबाई पवार चेअरमन कौतिकराव पवार तसेच शिक्षक कुलभूषण व्यवहारे, दिलीप महाजन, राजेंद्र शिंपी, श्रीमती नूतन पवार, श्याम खोसरे, सलीम आत्तार,श्रीमती किरण पाटील, राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

छत्रपती संभाजीनगर विभागात अन्न व औषध प्रशासनाची दोन आस्थापनांवर कारवाई

छत्रपती संभाजीनगर (भगवंत पाळवदे) : अन्न व औषध प्रशासनाने अन्नपदार्थांची गुणवत्ता व सुरक्षितता तपासण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत छत्रपती संभाजीनगर विभागातील दोन आस्थापनांवर कारवाई केली. बीड व लातूर जिल्ह्यांतील या आस्थापनांमधून ८९ हजार ९२० रुपये किमतीचा ५८३ किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला. कमी दर्जाचे अन्नपदार्थ व लेबलविषयक त्रुटींच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली.अन्न व औषध प्रशासनाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यातील विविध विभागांत अन्नपदार्थांची विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेंतर्गत बीड येथील मे. मंगलमूर्ती ट्रेडिंग कंपनी या आस्थापनेतून ६२ हजार ८० रुपये किमतीचा ३८८ किलो भरडधान्यांपासून तयार केलेल्या अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील मे. रेड्डीज एजन्सी या आस्थापनेतून २७ हजार ८४० रुपये किमतीचा १९५ किलो दूध बिस्किटांचा साठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्नपदार्थ कमी दर्जाचे असल्याचा किंवा त्यांच्या लेबलवर चुकीची माहिती असल्याचा संशय आल्याने ही कारवाई करण्यात आली.या विशेष मोहिमेत राज्यातील विविध विभागांमध्ये एकूण २४ लाख ९२ हजार ४५५ रुपये किमतीचा ६ हजार ४९५ किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील दोन आस्थापनांवरील कारवाईचा समावेश आहे.अन्न व्यवसाय चालकांनी अन्नसुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच संबंधित नियमांचे काटेकोर पालन करावे. अन्नपदार्थांची साठवणूक स्वच्छ व सुरक्षित वातावरणात करावी. आवश्यक परवाना, नोंदणी व लेबलविषयक नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. कमी दर्जाचे, भेसळयुक्त किंवा चुकीचे लेबल असलेले अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.नागरिकांना आवाहननागरिकांनी परवानाधारक किंवा नोंदणीकृत विक्रेत्यांकडूनच अन्नपदार्थ खरेदी करावेत. खरेदीपूर्वी उत्पादनाचे लेबल, बॅच क्रमांक, पॅकिंग दिनांक व वापराची अंतिम मुदत तपासावी. कमी दर्जाचे, कालबाह्य किंवा संशयास्पद अन्नपदार्थ आढळल्यास अन्न व औषध प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा https://complaints.mahafda.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करा, सम्यक विद्यार्थी आंदोलनाची मुक्त विद्यापीठाकडे मागणी

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे, तसेच विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने वसूल केलेले शुल्क परत करावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान यांनी केली आहे. यासंदर्भात गुरुवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय संचालकांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह इतर काही तालुके व जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले आहेत. तसेच, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीबाबत निर्णय घेतल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यासकेंद्रांना तातडीने शुल्कमाफीचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यावरील आर्थिक भार कमी करण्यासाठी परीक्षा शुल्क माफ करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क वसूल करण्यात आले आहे, त्यांना ते तातडीने परत करण्यात यावे, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसांत विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करून यापूर्वी वसूल केलेले शुल्क परत न केल्यास सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने विभागीय संचालक कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, डॉ. भीमराव वाघमारे तसेच सामाजिक कार्यकर्ते अमरदिप हिवराळे आणि क्षितीज सिंह यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

क्रांतीची मुळाक्षरे - सम्यक विचारधारेची मर्मग्राही कविता



कवीस्नेही सन्मित्र प्रशांतकुमार जी रंगरेषांच्या तरलं आत्मानुभूती एक सृजनशील चित्रकार कवी.अंतरंगातून सजग जाणिवाची प्रखर माणुसकीच्या गहिवरांची कविता देवून जातो.या देशात मायभूमीत अजूनही जात पात धर्म पताका घेऊन ही माणसं हैवान,सैतान झाली आहेत.त्यांच्या मनमस्तिष्कांत अजून जात आहे.जी मनुची कैदाशीन आहे.ती जात नाही.नितीमूल्यांची चाड त्यांना राहिली नाही.युगानुयुयाची गुलामी व लाचारी इथेल्या गाभाडलेल्या व्यवस्थेने दीन,दलित वंचितांना गावं वेशीबाहेर ठेवलं.पण या विश्वाचा प्रकांड पंडीत, प्रज्ञासूर्यमहामानव एक क्रांतीसूर्य उगवला व 'उध्दारली कोटी कुळे भीमा तुमच्या जन्मामुळे'.हा युगानुयुगाचा अंधार दुर झाला.तेंव्हापासून 'क्रांतीची मुळाक्षरे' आम्ही तना मनात निर्धारने कोरुन घेतली.आज ज्या गाव हडवाई शेजारी गावाकुसाबाहेर,खळवाडीचा आता भीमनगर मोहल्ला झाला.भीम अक्षर निळाई घेऊन आम्ही लेकरं आज उच्चविद्याविभूषित होऊन नव्या अस्मितेने उजळून निघालो.हातात धारदार निर्धाराची आंबेडकरी अस्मितेची मुळाक्षरे घेऊन.हेच साक्षेपी विचाराचं मर्मग्राही वास्तव मांडणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून विद्रोही शब्दांगार देऊन जाते.म्हणूनआंबेडकरी विचारांचे धारदार निर्धारक कवी प्रा.प्रशांतकुमार डोंगरदिवे यांच्या 'क्रांतीची मुळाक्षरे' या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध म्हणजे तथागत भगवान बुद्धांच्या त्रिशरण पंचशीलांच्या मध्यम सम्यक संबुध्दांच्या विचारांची बांधिलकी घेऊन येणारी ही कविता आहे.तथागत भगवान गौतम बुद्धांनी सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने ज्या निर्मिकांनी माणसंकीचा धम्म सांगितला पंचशील त्रिशरणाचा अंगीकार करावा.हाधम्मपथ आहे.अक्षरझरणी व नीबेतून पिंपळपर्णी व प्रज्ञासूर्यांचे शितळ नितळ सूर्यबिंब.कवी रंगरेखाकार प्रशांतकुमार यांचे मुखपृष्ठ आशय संपन्नतेचा सृजनशील 'क्रांतीची मुळाक्षरे' मनस्वी आविष्कार आहे.कवीची कविता ही जातीचं सरण रचतो ते असं की,"रचले सरण हिचे अन् लावला भडाग्नी/सरणातही जळेना ही जात माणसाची"(पृ.१५)आजही ही 'जात' माणसाची तीओंजळभर आरक्षण मागते व जाती जातीच्याचं लवकंडी लावून देतं आहे.इथे खरे भारतीय प्रजासत्ताक संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन जातीनिहाय आरक्षणची शिदोरी आठवते.आज सर्वहारा वंचित समाजबांधव शहराशी निगडित आहे.आम्ही स्वयं प्रकाशित झालो आहोत.पण आमचे आरक्षण ही त्यांची पोटशूळ आहे.कवी आपल्या सये ला ही सम्यक दृष्टींच्या प्रकाशमान स्त्रीयांची यशोगाथा सांगतो आहे.मुक्ता साळवे,ताराबाई शिंदे,फातीमा शेख,व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या विचारांची ही परिवर्तनाची सजग सकाळ होऊन तू आली पाहिजेस.हा निर्धाराचा विचार ही कविता देते.तर सुरुवात अशी,"घेऊन धम्मदीक्षा होऊनीया प्रबुद्ध/शोषणाचे जुलमी जोखड फेकून देत आहे/आता कुठे भीमा सुरुवात फक्त झाली/हे विश्व गौतमाच्या पायाशी झुकत आहे"(पृ.१७)हीकविता अत्यंत निस्सीम ध्येयपूर्तीची आहे.आजच्या समकालीन सर्वहारा वंचित घटकांच्या लेकरांच्या हाती नवी मुळाक्षरे कवी देतो आहे.ज्यांच्या हातात कटोरे आहेत त्यांच्या हाती लेखणी आली पाहिजे. "अ-अण्णाभाऊंचा,आ-आंबेडकरांचा,ब-बिरसांचा../आणि बघ/त्यांचे चिमुकले हात/कसे गिरवतात./क-क्रांतीचा..(पृ.१८)अशी अत्यंत निस्सीम ध्येयाची ही कविता आहे.ज्ञानप्रज्ञेच्या विचार श्रृंखलेशी ही कविता नवा आशय देऊन जाते.प्रा.मधुकर जाधव प्रस्तावनेत लिहितात " आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात 'क्रांतीचीमुळाक्षरे'नव्या अर्थाने वाचण्याची गरज आहे.या कविता केवळ विद्रोह व्यक्त करत नाही.त्या विवेकही जागवतात.आत्मपरिक्षण करायला भाग पाडतात.आणि समतेच्या दिशेने मार्गक्रमण करण्याची उर्मी देतात"(पृ.८)या कवितेने समकालीन वास्तवाचे सम्यक दृष्टीने समर्पक समृद्ध भान दिले आहे.आज सर्वव्यापी जी अमानूषता दिसते आहे.तीकवीच्या चिंतन धार होऊन व्यक्त होते.जसे" हातात परिवर्तनाची पताका घेऊन/मी निघालो आहे/एक जात, धर्म,वर्ण,पंथ, संप्रदाय,..विहीन/प्रबुद्ध युगनिर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी../जे येणार असतील त्यांनी यावं/समतेचे पथिक बनून.../मी मात्र चालतच राहणार आहे/माझा 'निर्धार' अढळ आहे!(पृ.३३)अशी ही सम्यक संबुध्दांच्या मध्यम विचारधारेची निर्धाराची ध्येयासक्ती घेऊन क्रांतीची मुळाक्षरे धिरोदत्तपणे गोंदवते आहे." सामाजिक नि सांस्कृतिक पातळीवरची विषमता, धर्मांधता, अन्याय अशा विघातक बाबी कशा घातक आहेत.याचे निर्मूलन करण्याचे पर्याय काय आहेत.याचे सुक्ष्म चित्रण चित्रांकित या कवितेने केले आहे.माणूसकेंद्रीयता ही या कवितेची अंतर्भूमी आहे"(पाठराखण) ख्यातनाम कवी समीक्षक महेंद्र ताजणे यांची चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचक समीक्षक पाठराखण हे या कवितेचा मर्मग्राही अनुबंध मानला पाहिजे.'क्रांतीची मुळाक्षरे' प्रशांतकुमार यांच्या कवितेचे सूर्यकुळांची अक्षरलेणी अशी दिशांकित झाली आहे.हे भाष्य अतिशय समर्पक सृजनशीलतेचे आहे.म्हणून ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने माणुसकीचा गहिवर मांडते.

पुस्तक परिचय:-क्रांतीची मुळाक्षरे (कवितासंग्रह)कवी :-प्रशांतकुमार डोंगरदिवे प्रकाशक:-समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर मुखपृष्ठ:- प्रशांतकुमार, चिखली मुद्रीत शोधन:- प्रा मधुकर जाधव द्वितीय आवृत्ती:- १५ ऑगस्ट २०२६पृष्ठ ८० किमत १५०/रूपयेपुस्तक



परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना

विचार हरले! पक्ष जिंकला!!

शेवटी राजकीय पक्ष जिंकला,
आणि विचार मात्र हरला...
मतपेटीत लोकशाही हसली,
विवेकाचा दिवा विझला!

कऱ्हाळे मास्तर हरले,
रविराज साबळेही हरले,
पण प्रश्न त्यांच्या पराभवाचा नाही,
प्रश्न आपल्या विचारांचा उरलेला आहे !

शिकलेली माणसं आहेत,
पदव्या आहेत, ज्ञानही आहे,
पण मतदानाच्या क्षणी
विवेकाचं भान कुठे आहे?

शिक्षणाने माणूस घडतो,
असं आपण मानत आलो,
मग शिकलेल्या समाजाने
विचारांना का दूर सारलं?

चेहऱ्यांवर विद्वत्तेचा मुखवटा,
ओठांवर परिवर्तनाच्या बाता,
पण कृतीच्या ऐन कसोटीवर
जिंकली पक्षनिष्ठेची सत्ता!

पक्ष जिंकला म्हणून विचार जिंकत नाही,
आणि माणूस हरला म्हणून विचार मरत नाही!

आजचा निकाल एक प्रश्न विचारतो,
शिक्षण फक्त पदवीपुरतं उरलं का?
की शिकलेल्या माणसानेही
स्वतःचा विवेक गहाण ठेवलाय?

कऱ्हाळे मास्तर, रविराज साबळे,
तुमचा पराभव हीच कहाणी नाही,
लोकशाहीच्या या आरशात
समाजाची मानसिकता दिसते काही!

शेवटी पक्ष जिंकला...
विचारशून्यता उघडी पडली!
मतांची बेरीज झाली,
पण विवेकाची वजाबाकी झाली!

डॉ. बाळासाहेब लिहिणार
मोबाईल. 9421245309

उन्हात सावली

उन्हात सावली
सावलीत ऊन
आयुष्याचे ऋण
वाढलेले

लहरी पाऊस
काय त्याची तऱ्हा
पडे सातबारा
काळजीत

असे सालोसाल
रोज चुकलेले
धागे तुटलेले
काळजाचे

दिस हे दुष्काळी
माथ्यावर आले
जिणे भेगाळले
पोशिंद्याचे

ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६

महाराष्ट्र ही संत-महंतांची पवित्र भूमी : स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज

दौलताबाद (जावेद अहमद) : महाराष्ट्र ही संत-महंतांची पवित्र भूमी आहे. या भूमीत अनेक महान संतांनी जन्म घेऊन समाजाला अध्यात्म, भक्ती आणि सदाचाराचा मार्ग दाखविला आहे आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांचे प्रतिपादनभांगशी माता गडावर बुधवार ऑक्टोबर रोजी आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज (हरिद्वार) यांचे आगमन झाले. यावेळी श्री १००८ स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते त्यांचे औक्षण करून भव्य स्वागत करण्यात आले. या धार्मिक सोहळ्यामुळे भांगशी माता गडावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.या प्रसंगी स्वामी रमेशगिरीजी महाराज (महंत, कोपरगाव, अहिल्यानगर) आणि महामंडलेश्वर १०००८ स्वामी शिवगिरी नंद महाराज यांच्यासह विविध साधू-संतांची उपस्थिती होती. पंचायत समिती सदस्य सर्जेराव चव्हाण, साडू पवार, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब काळे (नांदेडा) यांच्यासह भाविकांनी संतांचे स्वागत केले.गडावरील गोशाळेत स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांनी गायींना चारा देऊन गोमातेचे पूजन केले. त्यानंतर भगवान महादेव पशुपतीश्वराचे दर्शन घेऊन विधिवत पूजन केले. यावेळी गडावरील बालगोपाल व उपस्थित भक्तांना त्यांनी मार्गदर्शन केले.महाराष्ट्र ही संतांची पवित्र भूमीमार्गदर्शन करताना आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज म्हणाले की, महाराष्ट्र ही संत-महंतांची पवित्र भूमी आहे. या भूमीत अनेक महान संतांनी जन्म घेऊन समाजाला अध्यात्म, भक्ती आणि सदाचाराचा मार्ग दाखविला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच महाराष्ट्राच्या भूमीत स्वराज्याची स्थापना करून इतिहास घडविला.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात संतांच्या विचारांचा आणि आशीर्वादाचा प्रभाव जाणवतो. पंढरपूरची आषाढी एकादशीची वारी, आळंदी आणि पैठण यांसारखी पवित्र तीर्थक्षेत्रे ही महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेची साक्ष देतात. संतांच्या शिकवणीतून समाजाला सद्भावना, संस्कार आणि आध्यात्मिक प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.भांगशी माता गडावरील या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. संतांच्या दर्शनासाठी आणि आशीर्वादासाठी भक्तांनी उपस्थिती लावली.

जिल्हा परिषद शाळेत साहित्यिक विद्यार्थ्यांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : औरंगाबाद शहराजवळील राहाळपट्टी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेत नुकतेच साहित्यिक विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमाच्या माध्यमातून बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी भेट देऊन त्यांच्या चौथीला असलेला " कौतुकाची थाप " या पाठावर विश्लेषण करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. तसेच हा पाठ विद्यार्थ्यांना समजावूनही सांगितला आहे. यावेळी मुख्याध्यापक किरण आंबेकर यांनी लेखक अय्युब पठाण यांचा शाल व श्रीफळ पुष्पहार देऊन सत्कार केला. यावेळी शिक्षक तथा कवी मनोज खुटे, तसेच गावातील पालकवर्ग आणि शाळेतली विद्यार्थी हे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिण्याचे पाणी आणि शेतीच्या नियोजनासाठी समन्वयाने काम करा- सुनेत्रा अजित पवार

पुणे/बीड (भगवंत पाळवदे) : पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी शहर आणि ग्रामीण भागातील सर्व लोकप्रतिनिधी, महानगरपालिका आणि जलसंपदा विभागाने समन्वयाने काम करण्याची गरज आहे. भविष्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा अशा सूचना देवून पिण्याच्या पाण्याच्या नियोजनात १० टक्के पाणी बफर म्हणून राखून ठेवण्याचा निर्णय शासनाकडून यापूर्वीच घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. विभागीय आयुक्त कार्यालयात कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, विजय शिवतारे, भीमराव तापकीर, सुनील शेळके, ज्ञानेश्वर कटके, हेमंत रासने, सिद्धार्थ शिरोळे, बाबाजी काळे, शंकर जगताप, राहुल कुल, शंकर मांडेकर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.राज्य शासनाच्या प्रत्येक मंत्रिमंडळ बैठकीत या विषयाचा सविस्तर आढावा घेतला जात असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार उपलब्ध पाण्याचे नियोजन करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. अल निनोच्या संभाव्य परिणामांबाबत गेल्या सहा महिन्यांपासून चर्चा सुरू असून पाण्याच्या नियोजनाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत चर्चा करताना पुणे महानगरपालिकेने उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करून प्रभावी नियोजन करावे. तसेच पुणे महानगरपालिकेला १३ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. तसेच खडकवासला धरण प्रणालीतील पाणीसाठ्याचा विचार करून महानगरपालिका आणि जलसंपदा विभागाने पारदर्शक पद्धतीने नियोजनाची अंमलबजावणी करावी.पाणी वापराबाबत जनजागृती आवश्यक आहे.पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाणीकपात आणि अधिक पाणी वापरणाऱ्या उपक्रमांबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेनेही पाणी नियोजनाबाबत आवश्यक दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.यंदा पावसाळ्यात खरीप पिकांचे उत्पादन कमी झाले आहे. त्यामुळे आगामी रब्बी हंगामासाठीही पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील शेती आणि शहरातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे समन्यायी नियोजन करावे. पिण्यासाठी आणि शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा जपून वापर करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.दीर्घकालीन पाणीपुरवठा योजनेचा पाठपुरावाशहर पाणीपुरवठा योजना आणि एकूण पाणी वापराचा कोटा निश्चित करण्यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेऊन पाठपुरावा सुरू आहे. बैठकीत चर्चा करून निश्चित करण्यात आलेल्या पाणी आवर्तनाच्या नियोजनाची अंमलबजावणी करावी. त्यानंतर डिसेंबर-जानेवारीमध्ये परिस्थितीचा पुन्हा आढावा घेण्यात येईल. सर्वांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही श्रीमती पवार यांनी स्पष्ट केले.पाणीवाटपात कोणावरही अन्याय होणार नाही, यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करा – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटीलपाणीवाटपात कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. पाणी वितरणाचे योग्य नियोजन करून शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे, पाण्याचा पुनर्वापर, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि सर्व लाभधारकांना समान संधीने पाणी उपलब्ध करून देणे, या बाबींना प्राधान्य देऊन संबंधित विभागाने कार्यवाही करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.पिण्याचे पाणी आणि शेतीच्या पाणी नियोजनाबाबत झालेल्या बैठकीत उपस्थित आमदार आणि लोकप्रतिनिधींनी विविध महत्त्वाचे मुद्दे मांडले. त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.बैठकीला उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच जिल्हा परिषद, कृषी व पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत गुणात्मक परिवर्तनासाठी सर्वेक्षणाची मदत होईल - देवेंद्र फडणवीस

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : शासकीय योजनांची व्याप्ती वाढविणे, अधिकाधिक नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील परिणामकारकता तपासणे महत्वाचे असल्याने यासाठी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनाच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच त्यामध्ये गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. माहिती व जनसंपर्क विभागामार्फत नियुक्त ॲक्सिस माय इंडिया या संस्थेमार्फत विविध विभागांच्या योजनांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यासंदर्भात सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि योजना पश्चात सर्वेक्षणाबाबत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने योजनांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. योजनांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास, लाभार्थ्यांच्या माहितीचे विश्लेषण, योजनांमुळे साध्य झालेल्या परिणामांचे मूल्यमापन आणि त्यातून पुढील सुधारणांसाठी आवश्यक बाबी निश्चित करणे, अशा विविध स्तरांवर काम केले जात आहे. राज्यातल्या अधिकाधिक नागरिकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी या सर्वेक्षणांचा चांगला उपयोग होऊ शकतो. योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात सर्वेक्षणातून मिळणारी माहिती केवळ माहितीपुरती मर्यादित न ठेवता, त्यातून प्रत्यक्ष कामकाजात सुधारणा घडवून आणण्यास मदत होईल. उपलब्ध माहितीच्या आधारे योजनांची सद्य:स्थिती समजून घेणे, लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणी ओळखणे आणि अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे शक्य होणार आहे. त्यासाठी संबंधित विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांनी आवश्यक सहकार्य करावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या सर्वेक्षणाच्या माध्यमातून योजनांबद्दलची अचूक माहिती मिळण्यास मदत होईल तसेच शासनाच्या योजनांसाठी असणारा प्रतिसाद समजण्यास मदत होईल. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून अचूक डेटा बेस तयार होईल आणि लोकांना शासकीय योजनांचा अधिक लाभ मिळण्यास मदत होईल. या सर्वेक्षणातून शासकीय योजनांबाबत अधिक विश्वासार्हता निर्माण होऊन राज्य शासनास अचूक माहिती मिळेल आणि गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल.क्षेत्रीय कार्यालयांचा सहभाग महत्वाचा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी अधिक सुलभ करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांची भूमिका महत्वाची आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आवश्यक सहकार्य करून माहिती संकलन व विश्लेषणाच्या प्रक्रियेत समन्वय साधावा आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पूरक वातावरण निर्माण करावे.

शासकीय यंत्रणा आणि संबंधित संस्थेने एकसंघ भावनेतून काम केल्यास योजनांच्या अंमलबजावणीत अधिक चांगले परिणाम साधता येतील. उपलब्ध माहितीचा योग्य वापर, समन्वयपूर्ण कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभव यांच्या आधारे प्रशासकीय कामकाजात सुधारणा घडवून आणता येईल. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना अधिक परिणामकारक होण्यासह नागरिकांपर्यंत त्यांचा लाभ पोहोचविण्याच्या प्रक्रियेत गुणात्मक परिवर्तन घडविणे शक्य होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

बैठकीस राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते

सज्जन माणसे आणि चांगली पुस्तके भेटत नाही" - अय्युब पठाण लोहगावकर

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : छत्रपती संभाजीनगर शहराजवळील राहाळपट्टी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेत नुकतेच संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने साहित्यिक विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमाच्या माध्यमातून बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी भेट देऊन त्यांचा चौथीला असलेला " कौतुकाची थाप " या पाठावर विश्लेषण करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, " सज्जन माणसे आणि चांगली पुस्तके माणसांना लवकर भेटत नाही " यावेळी मुख्याध्यापक किरण आंबेकर यांनी लेखक अय्युब पठाण यांचा शाल व श्रीफळ पुष्पहार देऊन सत्कार केला. यावेळी शिक्षक तथा कवी मनोज खुटे, तसेच गावातील पालकवर्ग आणि शाळेतली विद्यार्थी हे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शितल नेवारे हिला सुवर्णपदक; पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

जालना : वाळूज (छत्रपती संभाजीनगर) येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन महिला जुडो स्पर्धेत जालना येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत महाविद्यालयाची खेळाडू शितल नेवारे हिने 52 किलो वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तसेच प्राची अंभोरे हिने 57 किलो वजन गटात तृतीय क्रमांक मिळवून कांस्यपदकाची कमाई केली.शितल नेवारे हिची गुजरात येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ जुडो स्पर्धेसाठी निवड झाली असून, ती या स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. तिच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. यावेळी क्रीडा विभागप्रमुख डॉ. भिकुलाल सले, क्रीडा समितीचे सदस्य डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. निशिकांत लोखंडे, डॉ. कुणाल देशपांडे, प्रा. अभिजीत भुतेकर, प्रा. अभिषेक ढेंबरे, खेळाडूंचे पालक श्री. प्रकाश अंभोरे व श्री. अनिल जाधव उपस्थित होते. खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबद्दल शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्यात.

मा. आ. बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : मा.आ श्री रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या वाढदिवसा निमित्त जाहिरात फलक आणि बॅनर न लावता सर्व सामान्य जनता आणि शेतकरी बांधवांना पाऊस न झाल्याने दुष्काळाचा सामना करावा लागत असल्याने एक मदतीचा आधार म्हणून मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मदत करण्यात आली आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकरी बांधवांना आणि गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने मुंबई मंत्रालय येथे “मुख्यमंत्री सहायता निधीसाठी” रक्कम रु.3 लाख 13 हजार 111 रुपयांचा धनादेश मा.मुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना सुपूर्द करण्यात आला या प्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय सौ.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर,भाजपा परभणी महानगर अध्यक्ष शिवाजीराव भरोसे,सुनिल भोंबे उपस्थित होते. संकटाच्या काळात समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत मदतीसाठी प्रयत्न करीत श्री सुनिल भोंबे श्री दिलीपराव देशमुख जिल्हा परिषद गट नेते श्री अशोक जेठवानी श्री सूरज पंजवाणी यांनी पुढाकार घेऊन आर्थिक मदत प्रदान केली.

Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६

आयारामांना सत्तेची पदे, निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या वाट्याला उपेक्षा; भाजपच्या पराभवाने पक्षांतर्गत नाराजी पुन्हा ऐरणीवर

बीड (भगवंत पाळवदे) : भाजप आणि महायुतीला अलीकडील राजकीय निकालांमध्ये बसलेल्या धक्क्याच्या पार्श्वभूमीवर आता पक्षाने खऱ्या अर्थाने आत्मचिंतन करण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा पक्षांतर्गत असंतोषाचा मोठा वणवा आगामी काळात उसळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दिवसभर राजकीय वर्तुळात भाजप आणि महायुतीच्या पराभवाची चर्चा सुरू असताना भाजपमधील काही नेते आणि प्रवक्तेही आत्मचिंतनाची भाषा बोलू लागले आहेत. या प्रतिक्रियांमधून केवळ निवडणुकीतील पराभवाची खंत व्यक्त होत नाही, तर पक्षाच्या संघटनात्मक कार्यपद्धतीविषयी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना मिळणाऱ्या वागणुकीविषयी साचलेली नाराजीही समोर येत असल्याचे चित्र आहे.गेल्या काही वर्षांत भाजपने इतर पक्षांतून आलेल्या नेत्यांना पक्षात सामावून घेण्यासोबतच त्यांना राजकीय प्रतिष्ठा आणि सत्तेतील संधी देण्यावर भर दिल्याची टीका वारंवार होत आहे. दुसरीकडे, अनेक वर्षे पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मात्र अपेक्षित पदे, प्रतिष्ठा आणि निर्णयप्रक्रियेतील स्थान मिळत नसल्याची भावना पक्षांतर्गत व्यक्त होत आहे. निवडणुकीच्या काळात पक्षाची बाजू मांडण्यासाठी, विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी आणि समाजमाध्यमांवर पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांचा वापर केला जातो; मात्र प्रत्यक्ष संधी देण्याची वेळ आली की त्यांना बाजूला ठेवले जाते, अशी त्यांची तक्रार आहे.केशव उपाध्ये यांच्या पोस्टमधून व्यक्त झाली खदखद ?भाजपचे ज्येष्ठ नेते केशव उपाध्ये यांनी समाजमाध्यमांवर केलेल्या पोस्टमुळे या चर्चेला आणखी धार मिळाली आहे. भाजपने सर्व जागा संघटनात्मक ताकदीच्या आधारे स्वतःच्या बळावर लढवल्या असत्या, तर पाचही जागांवर विजय मिळवता आला असता, अशा आशयाची भूमिका त्यांनी मांडल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या या प्रतिक्रियेकडे केवळ निवडणुकीतील गणिताविषयीचे मत म्हणून न पाहता, उमेदवार निवड आणि पक्षाच्या संघटनात्मक धोरणाविषयीच्या नाराजीच्या संदर्भातही पाहिले जात आहे.केशव उपाध्ये हे गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून भाजप आणि जनसंघाच्या विचारधारेसाठी सक्रियपणे काम करणारे कार्यकर्ते व नेते म्हणून ओळखले जातात. पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे, संघटनात्मक काम करणे आणि पक्षाची भूमिका जनतेसमोर मांडणे, या प्रक्रियेत अशा जुन्या कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. मात्र, दीर्घकाळ पक्षासाठी काम करूनही अपेक्षित राजकीय सन्मान आणि प्रतिष्ठा मिळत नसल्याची भावना अनेक जुन्या कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे बोलले जाते.दुसरीकडे, अन्य पक्षांतून भाजपमध्ये दाखल झालेल्या काही नेत्यांना तुलनेने कमी कालावधीत आमदारकी, खासदारकी, मंत्रिपद किंवा अन्य महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मिळाल्याने जुन्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्याची चर्चा आहे. हा असंतोष एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित नसून पक्षातील संधींचे वाटप, निष्ठेचे मूल्य आणि नेतृत्वाच्या निर्णयप्रक्रियेविषयी उपस्थित होणारा व्यापक प्रश्न असल्याचे राजकीय निरीक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.'निष्ठावंतांच्या लेकरांकडे दुर्लक्ष, आयारामांच्या कुटुंबीयांसाठी मात्र धावपळ!'भाजपमधील एका नेत्याच्या प्रतिक्रियेतून कार्यकर्त्यांमधील नाराजीची तीव्रता स्पष्ट होते. पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या कुटुंबीयांना संधी देण्याच्या बाबतीत नेतृत्वाकडून उदासीनता दाखवली जाते; मात्र अलीकडे पक्षात आलेल्या नेत्यांच्या कुटुंबीयांसाठी संधी उपलब्ध करून देताना विशेष तत्परता दाखवली जाते, अशा आशयाची टीका करण्यात आली आहे.या प्रतिक्रियेतील शब्द जरी कठोर असले, तरी त्यामागील राजकीय संदेश दुर्लक्षित करता येणार नाही. पक्षासाठी अनेक वर्षे संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्वतःच्या राजकीय भवितव्याबद्दल अनिश्चितता वाटत असेल, तर त्याचा परिणाम संघटनात्मक ताकदीवर होणे स्वाभाविक आहे. निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी केवळ प्रभावशाली नेते, आर्थिक ताकद किंवा सत्तेतील समीकरणे पुरेशी ठरत नाहीत. बूथ पातळीवर काम करणारा कार्यकर्ता, मतदारांशी असलेला त्याचा संपर्क आणि पक्षाविषयीची त्याची निष्ठा हेही तितकेच महत्त्वाचे घटक असतात.मात्र, अशा कार्यकर्त्यांना सातत्याने डावलले जात असल्याची भावना निर्माण झाली, तर ते मनापासून काम करण्यापासून दूर जाऊ शकतात. त्याचा फटका निवडणुकीत बसू शकतो. त्यामुळे भाजप नेतृत्वाने या नाराजीला केवळ काही व्यक्तींची वैयक्तिक खदखद समजून दुर्लक्षित करणे पक्षाच्या हिताचे ठरणार नाही.उमेदवार लादण्याची परंपरा पक्षाला महागात पडतेय?निवडणुकीतील उमेदवार निवड हा कोणत्याही राजकीय पक्षासाठी निर्णायक मुद्दा असतो. स्थानिक पातळीवर वर्षानुवर्षे काम करणारे कार्यकर्ते, त्यांची जनतेतील प्रतिमा, संघटनात्मक योगदान आणि मतदारांशी असलेला संपर्क यांचा विचार करून उमेदवारी निश्चित होणे अपेक्षित असते. मात्र, स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना आणि पसंतीला पुरेसे महत्त्व न देता उमेदवार निश्चित केले जात असल्याची टीका भाजपमध्येही होत आहे.काही ठिकाणी पक्षात नव्याने दाखल झालेल्या व्यक्तींना उमेदवारी देण्यात आल्याने जुने कार्यकर्ते नाराज झाल्याचे बोलले जाते. कोणत्या नेत्याला किती काळापासून पक्षाशी जोडलेले आहेत, त्यांचे संघटनात्मक योगदान काय आहे आणि स्थानिक पातळीवर त्यांना किती स्वीकारार्हता आहे, या मुद्द्यांपेक्षा इतर राजकीय समीकरणांना अधिक महत्त्व दिले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे.अर्थात, निवडणुकीतील प्रत्येक पराभवाचे कारण केवळ उमेदवार निवड किंवा कार्यकर्त्यांची नाराजी हेच असते, असे म्हणता येणार नाही. स्थानिक प्रश्न, मतदारांचा कल, विरोधकांची रणनीती आणि राजकीय परिस्थिती यांचाही निकालावर परिणाम होतो. मात्र, पक्षातील कार्यकर्तेच प्रचारापासून दूर राहिले किंवा त्यांनी मनापासून काम केले नाही, तर त्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालावर होण्याची शक्यता असते. त्यामुळे उमेदवार निवड प्रक्रियेत पारदर्शकता आणि स्थानिक कार्यकर्त्यांचा सहभाग वाढवण्याची गरज अधोरेखित होत आहे. भाजपनेच भाजपला पराभूत केले का?निवडणुकीतील पराभवानंतर उपस्थित होणारा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे भाजपला विरोधकांनी पराभूत केले की पक्षाच्या अंतर्गत निर्णयांमुळेच पक्षाचे नुकसान झाले? राजकीय वर्तुळात सध्या या प्रश्नावर चर्चा सुरू आहे. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवणारे आणि अनेक वर्षे संघटनात्मक काम करणारे कार्यकर्ते जर नाराज असतील, तर विरोधकांना त्याचा फायदा मिळू शकतो.भाजपची ताकद ही केवळ सत्तेतून निर्माण झालेली नाही. जनसंघाच्या काळापासून पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अनेक वर्षे संघर्ष केला. प्रतिकूल परिस्थितीत पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवली. अनेक ठिकाणी निवडणुकीत विजय मिळवण्यापूर्वी संघटन उभे करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली. त्यामुळे आज पक्षाला सत्ता आणि राजकीय विस्तार मिळाल्यानंतर याच कार्यकर्त्यांना दुय्यम स्थान मिळत असल्याची भावना निर्माण झाली, तर त्याचे परिणाम गंभीर असू शकतात.आज पक्षात आलेल्या नव्या नेत्यांना संधी देण्यास विरोध असण्याचे कारण नाही. राजकारणात विस्तारासाठी नव्या लोकांचे स्वागत आवश्यकच असते. मात्र, नव्यांना संधी देताना जुन्या कार्यकर्त्यांच्या योगदानाचा अवमान होऊ नये, त्यांना पूर्णपणे बाजूला सारले जाऊ नये आणि पक्षनिष्ठेचे महत्त्व कमी होऊ नये, ही अपेक्षा रास्त आहे. पक्षविस्तार आणि निष्ठावंतांचा सन्मान यांचा समतोल राखण्यातच भाजपच्या नेतृत्वाची खरी कसोटी आहे.संघ परिवारातील नाराजीची चर्चा; नेतृत्वासमोर नवे आव्हानया निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेविषयीही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. उमेदवार निवडताना स्थानिक संघटनात्मक भावना आणि कार्यकर्त्यांची पसंती यांचा पुरेसा विचार झाला नाही, तर त्याचा परिणाम मतदानावर होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.मात्र, संघ परिवारातील पदाधिकारी किंवा मतदारांनी ठरावीक उमेदवाराला मतदान केले नाही, असा निष्कर्ष काढण्यासाठी स्वतंत्र आणि ठोस पुरावे आवश्यक आहेत. तरीही, भाजपच्या पारंपरिक संघटनात्मक आधाराशी संबंधित कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याची चर्चा पक्ष नेतृत्वासाठी चिंतेचा विषय ठरू शकते. भाजपची निवडणूक यंत्रणा प्रभावी मानली जाते; परंतु या यंत्रणेचा पाया असलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झाला, तर त्याचा परिणाम पक्षाच्या कामगिरीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पक्ष नेतृत्वाने या नाराजीचे गांभीर्य ओळखून कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणे, उमेदवार निवड प्रक्रियेतील त्रुटींचा आढावा घेणे आणि संघटनात्मक पातळीवर निर्माण झालेली दरी भरून काढणे आवश्यक आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांचे निकाल देताहेत इशारा?पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही, तर त्याकडे केवळ काही जागांचा पराभव म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. या मतदारसंघांतील मतदारांचा कल, उमेदवारांची स्वीकारार्हता, स्थानिक प्रश्न आणि पक्ष संघटनेची कामगिरी यांचे सखोल विश्लेषण करावे लागेल.पदवीधर मतदार हा सुशिक्षित, विविध प्रश्नांवर भूमिका घेणारा आणि उमेदवाराच्या कामगिरीचे मूल्यमापन करणारा मतदारवर्ग मानला जातो. शिक्षक मतदारसंघातही शैक्षणिक प्रश्न, सेवाविषयक मागण्या, शिक्षकांचे प्रश्न आणि उमेदवाराशी असलेला संवाद महत्त्वाचा ठरतो. अशा मतदारसंघांमध्ये केवळ पक्षाचे नाव किंवा सत्तेतील प्रभाव यावर विजय मिळवता येईलच, असे नाही.शिक्षक मतदारसंघातील विजयामागे संघटनात्मक ताकद, स्थानिक समीकरणे आणि विविध घटकांचा पाठिंबा असू शकतो. त्यामुळे एखादा विजय किंवा पराभव हा एकाच कारणाशी जोडण्याऐवजी संबंधित मतदारसंघातील परिस्थितीचा स्वतंत्र आढावा घेणे आवश्यक आहे. मात्र, पदवीधर आणि शिक्षक मतदारांमध्ये पक्षाविषयी नाराजी असेल, तर ती समजून घेणे भाजपसाठी महत्त्वाचे ठरेल. भ्रष्टाचाराच्या आरोपांवर आणि सत्तेच्या वापरावरही प्रश्न भाजपच्या नेतृत्वावर टीका करताना काही कार्यकर्ते भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या नेत्यांना प्राधान्य दिले जात असल्याचा मुद्दाही उपस्थित करतात. पक्षात प्रवेश करणाऱ्या नेत्यांची राजकीय पार्श्वभूमी, त्यांच्यावरील आरोप आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या याबाबत पक्षाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.कोणत्याही व्यक्तीवरील आरोप सिद्ध होईपर्यंत तिला दोषी ठरवता येत नसले, तरी पक्षाच्या राजकीय भूमिकेत सातत्य आणि पारदर्शकता असणे आवश्यक आहे. विरोधकांवर भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून टीका करताना स्वतःच्या पक्षात आलेल्या नेत्यांबाबत वेगळी भूमिका घेतली जात असल्याची धारणा निर्माण झाली, तर पक्षाच्या विश्वासार्हतेवर परिणाम होऊ शकतो.त्याचप्रमाणे सत्ता मिळवणे, विरोधी पक्षांतील नेत्यांना आपल्या पक्षात आणणे आणि सत्तेतील समीकरणे मजबूत करणे यालाच प्राधान्य दिले जात असल्याची टीका होत असेल, तर नेतृत्वाने त्यावर आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. जनतेच्या प्रश्नांवर ठोस काम करणे, स्थानिक पातळीवरील समस्या सोडवणे आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे या बाबींकडे दुर्लक्ष झाल्यास राजकीय परिणाम भोगावे लागू शकतात.देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींसमोर आत्मपरीक्षणाचे आव्हानमहाराष्ट्रातील भाजपच्या राजकारणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे उमेदवार निवड, पक्षातील नव्या-जुन्या नेत्यांमधील समन्वय, कार्यकर्त्यांना मिळणाऱ्या संधी आणि संघटनात्मक निर्णयप्रक्रिया याबाबत नेतृत्वाला जबाबदारी घ्यावी लागेल.पक्षाच्या यशाचे श्रेय नेतृत्वाला दिले जात असेल, तर अपयशाच्या कारणांचाही प्रामाणिकपणे विचार करावा लागेल. प्रत्येक पराभवासाठी विरोधकांची रणनीती, मतदारांची दिशाभूल किंवा स्थानिक परिस्थिती यांनाच जबाबदार धरून चालणार नाही. पक्षाच्या निर्णयांमुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे का, स्थानिक नेतृत्वाला विश्वासात घेतले जाते का, उमेदवारी देताना निष्ठावंतांचा विचार होतो का आणि पक्षात काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला भविष्यात संधी मिळण्याची खात्री आहे का, या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील.आत्मचिंतन म्हणजे केवळ पराभवानंतर बैठका घेणे किंवा समाजमाध्यमांवर प्रतिक्रिया देणे नव्हे. चुकीचे निर्णय मान्य करणे, त्यामागील कारणे शोधणे आणि भविष्यात त्यांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी ठोस उपाययोजना करणे, हाच खऱ्या आत्मचिंतनाचा अर्थ आहे. आगामी निवडणुकांपूर्वी दुरुस्ती केली नाही, तर अडचणी वाढू शकतातराजकारणात काळ कोणासाठीही थांबत नाही. आज सत्तेत असलेला पक्ष उद्या विरोधात जाऊ शकतो, तर आज दुर्लक्षित असलेला कार्यकर्ता उद्या राजकीय समीकरणे बदलू शकतो. त्यामुळे पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांच्या भावना, जनतेचे प्रश्न आणि संघटनात्मक वास्तव यांचा योग्य वेळी विचार करणे आवश्यक असते.भाजपने आगामी निवडणुकांच्या दृष्टीने काही मूलभूत बदल करण्याची गरज आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान देणे, उमेदवार निवडताना स्थानिक परिस्थितीचा विचार करणे, नव्या नेत्यांना संधी देतानाच जुन्या कार्यकर्त्यांचा सन्मान राखणे, पक्षातील अंतर्गत संवाद वाढवणे आणि जनतेच्या प्रश्नांवर ठोस काम करणे, या बाबींना प्राधान्य द्यावे लागेल.आज व्यक्त होत असलेली नाराजी ही केवळ काही नेत्यांची प्रतिक्रिया म्हणून बाजूला सारली, तर भविष्यात ती मोठ्या राजकीय आव्हानाचे रूप घेऊ शकते. उलट, या नाराजीमागील कारणे समजून घेऊन पक्षाने योग्य सुधारणा केल्या, तर संघटनात्मक ताकद पुन्हा वाढवण्याची संधीही उपलब्ध आहे.*भाजपसमोर आज प्रश्न केवळ निवडणूक जिंकण्याचा नाही, तर पक्षासाठी वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवण्याचाही आहे. आयारामांना संधी देताना निष्ठावंतांना विसरायचे, सत्तेतील पदांचे वाटप करताना जुन्या कार्यकर्त्यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करायचे आणि पराभवानंतर आत्मचिंतनाची भाषा बोलायची, अशी कार्यपद्धती कायम राहिली तर पक्षांतर्गत असंतोष अधिक तीव्र होऊ शकतो.*त्यामुळे भाजप नेतृत्वाने आत्मचिंतन करण्याची वेळ येण्याची वाट पाहण्याऐवजी ती वेळ स्वतःहून स्वीकारली पाहिजे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना मानाचे स्थान, योग्य संधी आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग मिळाला, तरच पक्षाची संघटनात्मक ताकद टिकून राहील. अन्यथा, भाजपला विरोधकांशी लढण्यापूर्वी स्वतःच्या अंतर्गत नाराजीशी सामना करावा लागेल, हे नाकारता येणार नाही.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६

विकृत वर्तमान भेदायला निघालेली घणाघाती कविता 'अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युडा ट्रँगल



कवी संजय घाडगे नावाच्या अस्सल वादळी कवीने आपली नाममुद्रा 'वणवा' 'अंधाराला डोळे फुटता', 'निळया आभाळाचे गाणे', 'कविता तुझ्या माझया' या कविता संग्राहातून समर्थपणे उमटवली आहे. कवीला मी अनेक कवी संमेलनांत गेय कविता सादर करून, श्रोत्यांना प्रभावीत करतांना अनुभवले आहे. त्यांच्या गेय कविता रसीकांच्या मनाला भुरळ पाडतात. महाराष्ट्रातील कवितेच्या, प्रांतात प्रख्यात असं नाव म्हणून कवी संजय घाडगे याचं नक्कीच घ्यावे लागेल. 'अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युडा ट्रँगल' हे कविता संग्रहाचे मार्मिक शीर्षक सजग मनाला अस्वस्थ करून विचार करायला भाग पाडते. व्यवस्थेने मूल्य पोखरून टाकले आहे. अहिंसा, समता, मानवता, ममता, सह्‌दयता हे शब्दअर्थ हरवुन बसले आहेत. बर्म्युडा ट्रँगलचा शोध लागलाच नाही. शोध घेणाराच वाटेत हरवला अशी भीषण अख्यायिका आहे.क्रुर व्यवस्थेने असा महाक्रुर भेसूर, बर्म्युडा ट्रँगल समाजाभोवती उभा केला आहे. त्याला भेदण्याचा धाडसी, बेधडक प्रयत्न संजय घाडगे नावाचा बलदंड कवी करतोय हे महत्त्वाचे वाटते. कटी, मिठीवर कविता लिहिणा-या फुशारक्या कवींच्या कुवतीबाहेरचे हे अवघड काम आहे. या चिंतनशील कवीचे मी मनापासून अभिनंदन करतो. शब्दांचे शिवधनुष्य घेऊन तो बर्म्युडा ट्रँगल भेदायला निघालेला भीम सेनानी आहे! त्यांच्या धनुष्यातून निघालेला बाण व्यवस्थेच्या उराला भेदणारा आहे. या चिंतनशील विवेकी कवीला नवा समतामय सुंदर समाज निर्माण करायचा आहे. नवा छिपा भेदभाव मिटवायचा आहे. भेय-भेदाच्या भिंती नष्ट करून टाकायच्या आहेत. करूणेची फुले व ममतेच्या कळया फुलत रहाव्यात असा त्यांचा ध्यास आहे. पितृऋण फेडणारा कवी म्हणतो "उमलून यावे दु:ख तरारुन पिकात डोलावी कविता प्रसन्न व्हावे अवघे जगणे 'बा' च्या डोळयांत हसावी कविता" कवीला अस्वस्थ अशांत व्हावं लागतं. तरच अस्सल कवितेचा जन्म होतो. "माझ्यातल्या अस्वस्थ ज्वालामुखीचा उद्रेक कधी होईल हे सांगता येत नाही. "असं हा कवी म्हणतो. म्हणूनच त्याच्या काव्यरुपी पिस्तूलमधून ज्वालामुखीच्या ठिणग्या बाहेर पडल्या आहेत. "युगे अट्ठावीस विटेवरी उभा/ काय केले बापा आम्हासाठी" देवशरणतेवर घणाघात करणारी ही कविता संग्रहाची शान आहे. "जीव ओवाळून टाकी सा-या घरावर माय सा-या घराची सावली जशी हंबरते गाय" आईची महती अशा भावगर्भ शब्दांत साकार झाली आहे. मानवतेच्या आड येणारा प्रत्येक बर्म्युडा ट्रँगल गाडायची शथप घेणा-या या कवीला सलाम केला पाहिजे. "बाप कुणबी हो माझा माय कुणब्याची लेक नका विचारू कहाणी माझ्या काळजाला भोकं" अन्नदात्याची व्यथा कवी अशा भेदक शब्दात मांडतो. 'कविता म्हणजे काय असते' ही कवीची आशयघन कविता मनाचा ठाव घेते. कविता कवीचा श्वास, कवीचा ध्यास असंही कवी म्हणतो. मी तर म्हणतो - "ममतेचा पंख/ गर्जनेचा शंख बंडाचा डंख असते!"- ठिणगी पृष्ठ-३ निसर्गावर,पाखरांवरही अशा चौफेर विषयावर दमदार कविता लिहिणारा हा निष्णांत कवी आहे. "अंधार पेरला का वस्तीत पाखरांच्या धर्मांध माजला का वस्तीत पाखरांच्या शोधून काढ आता माणूस झोपलेला अंगार पेटलेला वस्तीत पांखरांच्या" वणव्यासारखं पेटत राहावं लागतं, आतलं असहिष्णुत्व जाळून टाकावं लागत! विवेकी विद्रोह हाच परिवर्तन धडवू शकतो याची कवीला जाण आहे. कर्मठ चालीरितींच्या नरक यातना भोगणा-या हताश, निराश समाजाला विज्ञानाचा झोत दाखवत मनात लख्ख उजेड पाडणारा हा जिंदादिल कवी आहे. कविता लिहिण्यासाठी कविला गर्भार व्हावं लागत म्हणजे खुप चिंतन मनन करावं लागतं हेच कवीला म्हणायचं आहे. 'फक्त जिंकण्यासाठी' ही या झुंजार कवीची झुंजार कविता आहे. हिंदू धर्म खतरे में है म्हणा-यांना हा कवी अनावृत्त करतो. दीन दुबळयांचं, वंचित, दलित, पीडितांचं, नाडलेल्या, पिचलेल्यांचं दु:ख कवेत घेतो चोरांच्या उलटया बोंबाना कवितेच्या भक्कम घणाने ठेचून-ठेचून टाकतो ! क्या बात है! एका कवितेत कवी म्हणतो - "हया आदिम दु:खाच्या आदिम कहाण्या कुरवाळत-कुरवाळत जगतोय मी!" कवीचं हे सोसणं समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आहे. त्याचा निर्धार ऊर्जापूर्ण आहे "निर्धार उर्जापूर्ण असला की, वादळही थोपवता येतं समतेच्या शत्रुंना कबरीत झोपवता येतं" समतेच्या शत्रुंना कबरीत झोपवणारा, त्यांच्यावर वज्रमूठ उगारणारा हा निर्भय कवी आहे. दुष्काळाच्या कवितेत कवीने म्हटलंय - "कुणी धाडा हो निरोप मायबाप सरकारला सा-या जगाचा पोशिंदा अन्नपाण्याविना मेला" या ओळी संवदेनशील माणसाचं काळीज पिळवटून टाकणा-या आहेत. "सूर्य संबुध्द झालं की आभाळही कवेत घेता येतं जे आजन्म अंधाराचे यात्री त्यांच्या हाती उजेड देता येतं" कवीच्या प्रभावी सर्जन प्रतिभेतून आलेल्या या श्रीमंत ओळी आहेत. माणूस ही एकच जात आहे असा संदेश भाळावरती कोरायचा सल्ला कवीने दिला आहे.काळया कातळावर उद्याची पहाट गाणी लिहायची प्रतिज्ञा करणा-या या वचनबध्द कवीने आदर्श घालून दिला आहे. तो गावच्या मातीला विसरत नाही. जात- पात न विचारणा-या पावसाची महती विसरत नाही. माणूस जातीचा गौरवशाली इतिहास विसरत नाही. म्हणूनच त्याची कविता चिंतनीय, मननीय अभिजनवादी कवितेच्या उरात धडकी भरवणारी सूर्यसन्मुख प्रकाशमान कविता आहे. "'सूया घे SS बिबं घे SS' म्हणत ती दारी आली पाठीवरच्या झोळीत तिच्या कोवळं मूल बांधलेलं उन्हाच्या किर्र SS पा-यात" अशा दुर्लक्षत विषयावरची कविता लिहून झपाटून गेलेला कवी संजय घाडगेच लिहू शकतो. ही कविता आंबेडकरवादी कवितेचं दालन समृध्द करेल यात शंका नाही, कवी म्हणतो- "बाबासाहेब, तुमच्यानंतर पिसाळलेल्या प्रतिगाम्यांच्या प्रखर धर्मांधतेच्या ज्वाला प्यायलो आहे संघर्ष नावाचा अग्निकल्लोळ माझया आत रिचवून, अहिंसात्मक प्रबुध्द भारत व्हावा म्हणून मी स्थितप्रज्ञ बुध्दाच्या शांत, शीतल सावलीत विसावलो आहे!" अशा शब्दांच्या घणाने मस्तवाल प्रतिगाम्यांना वाकवायला निघालेल्या या घणाघाती कवीस पुढील वाटचालीस खूप खूप हार्दीक शुभेच्छा !

डी. बी. जगत्पुरिया

मो. नं. ९८६०४८५३९८